"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 08, Issue: 02, Mar. – Apr. 2021 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (SJIF) – 5.266

# भारतातील आदिवासी समुदायाची स्थिती व समस्या

**डॉ. योगेश भादे**
सहायक प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
विवेकानंद कला सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ,
औरंगाबाद

**प्रस्तावना**

भारतीय समाज विविधातपूर्ण आहे. जाती, धर्म, भाषा, प्रदेश यासह अनेक घटकांमध्ये भारतीय समाज विभागलेला आहे. आधुनिक काळात जाती, धर्म आणि भाषा यामधील अंतर काहीसे अस्पष्ट होत चालले असून समाजातील सर्वच घटक आता विकासाच्या समान प्रवाहामध्ये आलेले दिसून येतात. किंबहुना शासनाच्या योजनांचा लाभ सर्व स्तरांपर्यंत पोहोचत आहे. परंतु हा लाभ समप्रमाणात आहे अस म्हणता येणार नाही. प्रामुख्याने जो समाज शहरी किंवा ग्रामीण भागाशी संबंधित आहे त्यांच्यापर्यंत या योजना कमी अधिक प्रमाणात पोहोचतांना दिसतात परंतु जे अजूनही शहरी किंवा ग्रामीण भागापासून दूर आहेत जे जंगलामध्ये, दुर्गम वनांमध्ये स्थायिक आहेत, ज्यांना आदिवासी असे म्हटले जाते, अशा समुदायाचा येथे संदर्भ येतो. या समाजाची एक स्वतंत्र ओळख आहे, स्वतंत्र जीवनशैली आहे. भारतात अनेक जमाती असून या सर्व जमाती भाषा, संस्कृती याबाबतीत एकमेकांपासून भिन्न आहेत. देशातील शहरी आणि ग्रामीण समाजापेक्षा हे समाज खूप मागासलेले आहेत. वाढती लोकसंख्या, वनांचे घटते प्रमाण यासारख्या कारणांमुळे हजारो वर्षांपासून स्वतंत्र जीवन जगणारा हा समाज आता सुरक्षित राहिलेला नाही. स्वातंत्र्य प्राप्ती पासून या समुदायाच्या विकासासाठी घटनात्मक तरतुदी, प्रशासकीय यंत्रणा, विविध विकास योजना, प्रकल्प, कार्यक्रमे या माध्यमातून

शासन स्तरावर विविध प्रयत्न केले गेले, परंतु त्या प्रयत्नांना अपेक्षित यश लाभलेले दिसून येत नाही. सदर लेखामध्ये भारतातील या आदिवासी समुदायाच्या समस्यांचा आढावा घेतलेला आहे. देशातील इतर समुदायांपेक्षा आदिवासी समुदायांच्या समस्या भिन्न आहेत, त्यांच्या गरजा भिन्न आहेत, त्यांचा सांस्कृतिक वेगळेपणा कायम राखून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणणे हे एक जटिल कार्य आहे. भारतातील जमाती त्यांच्या सामाजिक-आर्थिक आणि राजकीय विकासाच्या दृष्टीने भिन्न आहेत. त्यापैकी काहींचे विविध प्रमुख धर्मामध्येसमवेशीकरण झालेले आहे. काही आदिवासी लोक संक्रमणाच्या टप्प्यात आहेत, तर काही त्यांच्या जुन्या जीवनशैलीला चिकटून आहेत. यातून भारतातील आदिवासी समाजातील लोकांमधीलबदल आणि विकासाची असमान प्रक्रिया दिसून येते. त्यांच्या विकासासाठी आखण्यात आलेल्या धोरणांचा आणि कार्यक्रमांचा फायदा फक्त काही आदिवासी समाजातील लोकांनाच झाला आहे.

**भारतातील आदिवासी समुदाय**

२०११ सालच्या जनगणणेनुसार, भारतात अनुसूचित जमातींची संख्या १०,४२,८१,०३४ इतकीआहे. तीचे प्रमाण भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८.६% आहे. अनुसूचित जमातीचे एकूण ९,३८,१९,१६२ लोक ग्रामीण भागात राहतात तर १,०४,६१,८७२ लोक शहरी भागात राहतात. ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्येच्या११.३% आणि शहरी भागातील २.८% अनुसूचित जमाती आहेत. मध्यप्रदेश, ओरिसा, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र आणि बिहारमध्ये या समुदायांची लोकसंख्या २२.९७ टक्के (मध्य प्रदेशात) ते ८.३१ टक्के (बिहारमध्ये) दरम्यान आहे. मिझोराम, अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि मेघालय यांसारख्या लहान राज्यांमध्ये एकूण लोकसंख्येत ८०टक्क्यांहून अधिक लोकसंख्या या समुदायाची आहे. आदिवासी समुदायासाठी Aborigines, Indigenous people, First People, मूळ निवासी हे पर्यायी शब्द वापरले

जातात. २०११ सालच्या आकडेवारीनुसार भारतात सुमारे ७०५ आदिवासी जमाती आहेत.यामध्ये भिल्ल, गोंड, मुंडा, संथाळ, टोटो,बोडो, खासी, अंगामी, भूतीया,गारो, निशी, वारली, कातकरी, चेनचू, सिद्धी, सोळिगा, कोडा, तोंडवा,इरूलार, कुरूम्बा, अंदमाणीइत्यादी प्रमुख जमाती आहेत.भारतीय संविधानात या समुदायांसाठी अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) ही संज्ञा वापरलेली आहे. संविधानातील कलम ३३६ व ३४२ अनुसूचित जमातींशी संबंधित असून कोणत्या समुदायाचा या प्रवर्गात समावेश करायचा किंवा वगळायचे याबाबत राष्ट्रपतींना अधिकार प्रदान केलेला आहे. परंतु जमात (Tribe) या शब्दाची व्याख्या केलेली नाही. प्रा. डॉ. डी . एन. मुजुमदार यांनी अनुसूचित जमातीची काही वैशिष्ट्ये सांगितली आहे.

१. जंगलात किंवा डोंगरात वास्तव्य करणारा, पूर्णतः किंवा अंशतःपृथक समुदाय.
२. विशिष्ट अशा भौगोलिक सीमा असलेल्या प्रदेशातील वास्तव्य
३. स्वतंत्र बोलीभाषा असलेला
४. वैशिष्ट्यपूर्ण अशी जीवनपद्धती किंवा संस्कृती असलेला
५. नैसर्गिक वातावरणात राहणारा
६. स्वतंत्र विश्वास, श्रद्धा आणि देव-देवतांना मानणारा समुदाय

थोडक्यात मुख्य प्रवाहापासून पूर्णपणे वेगळे व स्वतंत्र अस्तित्व असलेला हा समुदाय आहे. याव्यतिरिक्त काही अभ्यासक आहे ज्यांनी या समुदायाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्यामध्ये गिलिन आणि गिलिन, जी. एस. घुर्ये, हटन, बी. एस. गुहा यांचा उल्लेख करता येईल. गिलिन आणि गिलिन यांच्या मते, एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषाबोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा परंतु अक्षर ओळख नसलेला स्थानिक गटाच्या समुच्चयास आदिवासी समुदाय म्हणता येईल. जी. एस. घुर्ये यांच्या मते, आदिवासी लोकांचे योग्य वर्णन हेत्यांच्या कथित स्वयंसिद्धतेशी न जोडता ते हिंदू समाजातील किंवा त्यांच्या जवळील

स्थानाशी संबंधित असले पाहिजे. काही आदिवासी हे हिंदू समाजात व्यवस्थितरित्या एकरूप झालेले आहेत तरकाही शिथिलपणे एकत्रित आहेत, तर काही जमाती डोंगर आणि जंगलात एकाकी राहतात. घुर्ये यांनी अनुसूचित जमातींना 'मागास हिंदू' म्हणणे पसंत केले. अध्ययनाच्या दृष्टीनेभारतातील आदिवासींचेभौगोलिक तथा भाषिक आधारावर वर्गीकरण केले जाते. भौगोलिक क्षेत्र अनुसार उत्तर-उत्तर -पूर्व भागआदिवासी ज्यामध्ये कश्मीर, पंजाब, उत्तर प्रदेश, नागालँड, आसाम प्रदेशातील जमातींचा समावेश होतो, मध्य भाग ज्यामध्ये बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान या प्रदेशांतील समुदायांचा समावेश होतो, तिसऱ्या भागात म्हणजेच दक्षिण भागात दक्षिण महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ या प्रदेशातील समुदायांचा समावेश होतो. भाषिक आधारावर या समुदायांचे तीन वर्ग पडतात. सिनोतिबेटन, ऑसट्रिक आणि द्राविडी असे तीन भाषिक वर्ग आहेत.

**भारतातील आदिवासी समाजाच्या समस्या**

भारतात आदिवासी समुदाय अनेक राज्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात आढळून येतात.या सर्व समुदायांचा शोध घेवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन स्थरावर प्रयत्न केले जात आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच शासकीय पातळीवर विविध योजना, कार्यक्रम राबवून या समुदायाचा विकास कसा करता येईल, त्यांना विकसित समुदायाप्रमाणे जीवनमान साध्य करता यावे यासाठी प्रयत्न केले गेले आहेत. परंतु त्या प्रयत्नांमध्ये काही त्रुटी राहून गेल्या ज्यामुळे या समुदायाच्या विकासात अनेक अडथळे येत गेले. अजूनही काही समस्या आहेत ज्या या समुदायाच्या प्रगतीमध्ये अडसर ठरतात. या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१. शिक्षणाचा अभाव:**

२०११ सालच्याजनगणनेनुसार एकूण राष्ट्रीय साक्षरतेचे प्रमाण ७३ होते. आदिवासी समुदायातील साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय प्रमाणापेक्षा खूप कमी म्हणजे ५९ टक्के इतके होते. आदिवासींच्या विकास प्रक्रियेत त्यांचा अधिकाधिक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शिक्षण हे एक प्रभावी साधन म्हणून काम करू शकते.तरीही आदिवासींना शिक्षणामध्ये अडसर ठरणारे काही घटक आहेत जे दीर्घकाळापासून दुर्लक्षित आहेत.या घटकांमध्ये अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह, आत्यंतिक गरिबी, काही जमातींची भटकी जीवनशैली, मातृ भाषेतून किंवा स्थानिक भाषेतून शिक्षणाचा अभाव, परकीय भाषेतून शिकवल्या जाणाऱ्या परदेशी विषयांमध्ये रस नसणे आणि आदिवासी भागात योग्य शिक्षक आणि इतर सुविधांचा अभाव यांचा समावेश होतो.

**२. नैसर्गिक संसाधनावरील नियंत्रण गमावणे:**

भारतीय उपखंडात इंग्रज येण्यापूर्वी आदिवासीना जमीन, जंगल, वन्यजीव, पाणी, मातीइत्यादी नैसर्गिक साधनसंपत्तीवर मालकी आणि पूर्ण अधिकार होते . भारतात औद्योगिकीकरणपश्चात आणि खनिज व इतर संसाधनांचा शोध लागल्याने आदिवासी वस्ती असलेल्या भागात मोठ्या प्रमाणावर बाह्य जगाचे अतिक्रमण होत गेले .आदिवासींच्या हक्काची जागा राज्य नियंत्रणाखाली गेली .येथून पुढे आदिवासींच्या दुःखाची मालिका सुरु होते. स्वातंत्र्यानंतर विकास प्रक्रियेला गती मिळाल्याने वन जमीन आणि जंगलांवर दबाव वाढला ,त्यातून निर्वनीकरण जलद होत गेले .यामुळे आदिवासींच्या उदरनिर्वाहाच्या क्षेत्रावर अतिक्रमण झाले .त्यातून दीर्घकालीन कर्जबाजारीपणा, जमीनदार, सावकार, कंत्राटदार आणि अधिकारी यांच्यामुळे जमिनीवरील मालकी हक्क मर्यादित झाले. संरक्षित जंगले आणि राष्ट्रीय जंगले या संकल्पना चलनात आल्याने, आदिवासींना त्यांच्या नैसर्गिक आणि

अनेक पिढ्यांपासून चालत आलेल्या हक्काच्या जमिनीवरील, वनांवरील नियंत्रण गमवावे लागले.

**३ .विस्थापन आणि पुनर्वसन:**

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर देशापुढे आर्थिक विकासाचे लक्ष्य निर्धारित केले गेले. आर्थिक विकासासाठी मुख्य भर दिला गेला अवजड उद्योग क्षेत्रावर. देशांतर्गतमोठे पोलाद प्रकल्प, ऊर्जा प्रकल्प आणि जलसिंचनाच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी मोठी धरणे उभारली गेली .देशाच्या विकासासाठी औद्योगिकीकरण हे नितांत गरजेचे होते, मात्र त्याची किंमत मोठ्या प्रमाणार चुकवावी लागली ती वनांमध्ये आणि जंगलामध्ये स्थायिक आदिवासी समुदायांना .औद्योगिकीकरणासाठी तसेच मोठ मोठी धरणे बांधण्यासाठी निर्वनीकरण करण्यात आले. त्यापैकी बहुतांश आदिवासी वस्ती असलेल्या भागातखाणकामालाही वेग आला. या प्रकल्पांसाठी सरकारने आदिवासींच्या जमिनी संपादित केल्यामुळे आदिवासींचे मोठ्या प्रमाणावर विस्थापन झाले. छोटानागपूर प्रदेश, ओरिसा, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेशातील आदिवासींना याचा सर्वाधिक फटका बसला. सरकारने दिलेली रोख नुकसानभरपाई अपर्याप्त ठरली. औद्योगिक क्षेत्रातील विस्थापित आदिवासींसाठी, ज्यांना झोपडपट्ट्यांमध्ये परिघात राहण्यास भाग पाडले गेले किंवा गरिबीच्या परिस्थितीत अकुशल कामगार म्हणून काम करण्यासाठी लगतच्या राज्यांमध्ये स्थलांतरित केले गेले, त्यांच्यासाठी कोणत्याही वसाहती प्रदान केल्या गेल्या नाहीत. उदरनिर्वाहासाठी या आदिवासींना शहरी भागात स्थलांतर करावे लागले परंतु शहरी जीवनाशी जुळवून न घेवूशकल्यामुळे त्यांच्यापुढे अनेक सामाजिक ,आर्थिक ,राजकीय तथा मानसिक समस्या निर्माण झाल्या.

**४.सामाजिक समस्या:**

आदिवासी समुदायांचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन वैशिष्ट्यपूर्ण होते. निसर्गावस्थेपासून चालत आलेले त्यांचे जीवन हे एक प्रकारे स्वयंपूर्ण आणि संपन्न असे होते. मुख्य समाज प्रवाहापासून दूर राहून त्यांनी आपली खास जीवनशैली विकसित केली होती. समुदायाच्या अंतर्गत गरजा पूर्ण करू शकेल अशी त्यांची संस्कृती होती. प्रगत बाह्य जगताशी संपर्क आल्यानंतरहा समुदाय मोठ्या प्रमाणवरविचलित झालेला दिसून येतो. या समुदायाची जीवनशैली त्यांच्या अंतर्गत गरजांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने परिपूर्ण असली तरी बाह्य जगतापेक्षा ते खूप मागे होते. निरक्षरता, अंधश्रद्धा, देवभोळेपणा अशा स्वभावामुळे प्रगत समजाच्या तुलनेत हा समुदाय खूप मागासलेला बनला. यांच्या याच परिस्थितीचा बाह्य प्रगत समाजाकडून गैरफायदा घेण्यात आला. बाह्य प्रगत संस्कृतीच्या संपर्कातून या समुदायाच्या पारंपारिक संस्कृतीचा ऱ्हास होत गेला. गरिबी मुळे समुदायातील स्त्री-पुरुष यांचे शोषण होऊ लागले. विस्थापना, बेकारी,व्यसनाधीनता अशा अनेक समस्यांमुळे या समुदायाच्या अडचणी वाढत गेल्या.

**५. आर्थिक समस्या:**

आदिवासींचे वास्तव्य मुळात वनांत आणि डोंगरदऱ्यात असते. जंगलातील संसाधनांवर आधारित आर्थिक व्यवस्था असलेल्या या समुदायाच्या जीवनमानाचा दर्जा खालावलेला आहे. वन विभागाची कार्यपद्धती, सुपीक जमिनीचा अभाव,अस्थिर शेती, शेतजमिनीचाऱ्हास, शेतीपूरक व्यवसायाचा अभाव, शहरी भागात वेठबिगारी आणि गुलामगिरी अशा अनेक समस्या आदिवासी समुदायाच्या आर्थिक परिस्थितीला प्रभावित करीत असतात. मुळात विस्थापनामुळे अनेक समुदायांना आपली पारंपारिक व्यवसायाला मुकावे लागले. तसेच जे वनांत राहतात त्यांच्या अज्ञानामुळे त्यांचे प्रगत समाजातील सावकार जमीनदार वर्गांकडून शोषण केल्या गेल्याचेदेखील दाखले आहेत.

अनेक वर्ष हा समुदाय मुख्य प्रवाहापासून दूर राहिल्यामुळे देशातील विकासाच्या प्रक्रियेत त्यांना सहभागी होता आले नाही. त्यामुळे आर्थिक विपन्नता, गरिबी, दारिद्र्य सारख्या समस्यांमुळे हा समाज त्रस्त आहे.

**६. आरोग्य आणि पोषण समस्या:**

आर्थिक मागासलेपणा, आरोग्य सुविधेचा अभाव किंवा कमतरता, गरीबी आणि असुरक्षित जीवनमान यांमुळे आदिवासींना आरोग्याच्या अनेकविध समस्यांचा सामना करावा लागतो, ज्यामध्ये मलेरिया, कॉलरा, क्षयरोग, अतिसार आणि कावीळ सारख्या विविध रोगांचा प्रादुर्भाव, लोहाची कमतरता आणि अशक्तपणा, उच्च बालमृत्यू दर, जीवनाची निम्न पातळी यासारख्या कुपोषणाशी संबंधित समस्या समावेश होतो. मुळात स्वातंत्र्यप्राप्ती नंतर देशात जो आरोग्य क्षेत्राचा विकास आणि प्रसार झाला तो प्रामुख्याने शहरी आणि ठराविक ग्रामीण भागापुरताच मर्यादित होता. आदिवासी समुदाय जो पारंपरिक जीवन शैली जगतो आणि जिथे अंधश्रद्धा आणि जुनाट प्रथा-परंपरांचा मोठा प्रभाव आहे तिथे आरोग्य सुविधेचा जाणीवपूर्वक आणि प्रभावीपणे विस्तार होणे गरजेचे होते.

**७. राजकीय समस्या:**

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर अस्तित्वात आलेल्या संविधानाने भारतात कायद्याचे राज्य निर्माण करून लोकशाही व्यवस्था स्वीकारली. लोकशाही म्हणजेच लोकांचे शासन. देशाची सर्वोच्च सत्ता जनतेच्या हाती सोपवली. त्यामुळे आता सर्वांना या राजकीय व्यवस्थेत समान सहभाग घेता येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. संविधानाने सर्व नागरिकांना समान सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्क प्रदान केले. याबरोबरच लोकशाहीला मजबूत करण्यासाठी तिचे विकेंद्रीकरण करण्यात आले. तळागाळापर्यंत लोकशाहीला पोहोचवण्यात आले. सर्व स्थरातील नागरिकांना या व्यवस्थेत सहभाग देण्यात आला. सर्व जाती, धर्माच्या लोकांना संधी देण्यात आल्या. मात्र याठिकाणी

आदिवासी किंवा ज्यांना अनुसूचित जमाती असे म्हटले गेले त्यांना मात्र पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही. या समुदायातील ठराविक वर्ग जे शहरी किंवा ग्रामीण भागाच्या संपर्कात आले त्यांना या व्यवस्थेत संधी मिळाली मात्र जे अजूनही वनात, जंगलात किंवा दुर्गम अशा डोंगर-दऱ्यात वास्तव्याला आहे त्यांना मात्र या राजकीय हक्काचा लाभ घेता आला नाही. या समुदायापर्यंत शासनाच्या कल्याणकारीयोजना पोहोचू शकल्या नाहीत. या समुदायांच्या राजकीय सहभागाला वृद्धिंगत करणे गरजेचे आहे आणि हे तेंव्हाच शक्य होईल जेंव्हा या क्षेत्रात शिक्षण सुविधा पोहोचतील. पायाभूत सुविधांचा अभाव, निरक्षरता आणि अज्ञान यामुळे हा समुदाय राजकीयदृष्ट्या देखील मागास राहिला.

**समारोप**

आदिवासीसमाजाच्या अनेक समस्या आहेत. आणि त्या समस्यांच्या पाठीमागे विविध घटक प्रामुख्याने जबाबदार आहेत. मुळात अज्ञान, अंधश्रद्धा, देवभोळेपणा, भित्रेपणा, अल्पसंतोषी वृत्ती, असंघटीतपणा यासह विकसित तथा प्रगत समाजापासून दीर्घकालीन दुरावा यामुळेदेखील या समुदायाचा विकास होऊ शकला नाही.तसेच प्रगत समाजाचा या समाजाकडे बघण्याचा दृष्टीकोन देखील येथे प्रकर्षाने नमूद करता येईल. भोळ्या-भाबड्या, निरक्षर असा हा समाज जेंव्हा-जेंव्हा प्रगत समाजाच्या संपर्कात आला तेंव्हा -तेंव्हा अनेक ठिकाणी त्यांचे शोषण केले गेले. प्रगत समाज जितका अधिक विकसित होत गेला तितकीच या प्रगत समाजातील संवेदनशीलता देखील घटत गेली. स्वार्थी राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी, स्थानिक जमीनदार, सावकार आणि निष्क्रिय समाज हे सर्व घटक आदिवासींच्या अधोगतीस जबाबदार आहेत. त्यामुळे केवळ शासन किंवा प्रशासनाला येथे जबाबदार न धरता सर्वांना सोबत घेऊन सर्वसमावेशक अशा योजना आणि उपक्रमांची नितांत गरज आहे.लोकशाहीचे विकेंद्रीकरणकरतांना केंद्र, राज्य आणि ग्रामीण असे तीन

स्तर पुरेसे नाहीत. यामध्ये चौथ्या स्तराची भर घालून वने, जंगले तथा दुर्गम डोंगर- दऱ्यातील भागाचा त्यात समावेश व्हावा. आदिवासी समुदायातील नवशिक्षित तरुणांना संघटीत करून आदिवासी क्षेत्रात स्वयंसेवक म्हणून जबाबदारी सोपवावी. विकासाच्या प्रक्रियेत या समुदायाचे अन्य विकसित जातींकडून किंवा सधन वर्गांकडून शोषण होणार नाही यासाठी यावर लक्ष ठेवणारी एक सक्षम यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. या यंत्रणेत मानव हक्क कार्यकर्त्यांचा जास्तीत जास्त सहभाग अपेक्षित आहे. थोडक्यात आदिवासी हे या भूमीवरील मुळ निवासी आहेत. त्यांना दुर्लक्षित करून देशाच्या विकासाची कल्पना करता येणार नाही.

**संदर्भ:**

1. भारतीय संविधान

2. शिरसाठ एस. टी. , 'आदिवासी विकास व पंचायत राज: पाचव्या अनुसूचित क्षेत्राचा विशेष संदर्भ", अजमेरासुर्यकांत संपादित 'आदिवासी व ग्रामीण विकास', अथर्व प्रकाशन, धुळे, २०१०

3. आपले हक्क आणि परिपूर्ति, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, जुलै, २०१०

4. Roy Bramun, "Tribe and their country", City Book Society, Calcutta, 1912

5. Xaxa,Virginius. "Politics of language, religion and identity: Tribes in India". *Economic and political weekly*, 1363-1370. 2005

6. Haseena, V. A. "Land alienation and livelihood problems of scheduled tribes in Kerala." *Research on Humanities and Social Science* 4.10 (2014): 76-81.

7. Xaxa, Virginius. "Tribes as indigenous people of India." *Economic and political weekly* (1999): 3589-3595.